# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

**MARATHI**

1969 to 2029 REACHING NATIONS ECHO OF HIS CALL SINCE 1969

*India's National Spiritual Newspaper*

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHAUL BENJAMIN SHINDE

VOL: XXVIII | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2026 AUGUST | No. 07


## पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

**स्तोत्रसंहिता १३६:१-१०**

१. अहो तुम्ही यहोवाला धन्यवाद द्या, कारण तो उत्तम आहे, कारण त्याची प्रेमदया सर्वकाळ आहे.

२. अहो तुम्ही देवांच्या देवाला धन्यवाद द्या, कारण त्याची प्रेमदया सर्वकाळ आहे.

३. अहो तुम्ही प्रभूंच्या प्रभुला धन्यवाद द्या, कारण त्याची प्रेमदया सर्वकाळ आहे.

४. जो एकटाच मोठी अद्भुते करतो त्याला, कारण त्याची प्रेमदया सर्वकाळ आहे.

५. ज्याने बुद्धीने आकाशे निर्माण केली त्याला, कारण त्याची प्रेमदया सर्वकाळ आहे.

६. ज्याने पृथ्वी जलांवर विस्तारली त्याला, कारण त्याची प्रेमदया सर्वकाळ आहे.

७. ज्याने मोठ्या ज्योती निर्माण केल्या त्याला, कारण त्याची प्रेमदया सर्वकाळ आहे.

८. ज्याने दिवसावर अधिकार चालवायला सूर्य निर्माण केला त्याला, कारण त्याची प्रेमदया सर्वकाळ आहे.

९. ज्याने रात्रीवर अधिकार चालवायला चंद्र व तारे निर्माण केले त्याला, कारण त्याची प्रेमदया सर्वकाळ आहे.

१०. ज्याने मिसराला, त्यांच्या प्रथम जन्मलेल्यांना मारले त्याला, कारण त्याची प्रेमदया सर्वक्राळ आहे.



# तुम्हाला ख्रिस्ताचा उत्तम सैनिक होण्यासाठी पाचारण करण्यात आले आहे!

**You are called to be a good SOLDIER FOR CHRIST!**

*- सिस्टर अँजेलिन*



आपला प्रभू व तारणारा येशू ख्रिस्त, जो मेलेल्यांतून उठला आहे, जो आज राज्य करीत आहे आणि जो लवकरच पुन्हा येणार आहे, त्या राजाच्या अमूल्य नावाने आपणांस शुभेच्छा.

आमचे संस्थापक पास्टर एस. सॅम सेल्वा राज, तसेच **एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीज** मधील सर्व सहकारी आणि विश्वासू समर्थक यांच्या वतीने, भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनाच्या या आनंददायी आणि मंगलमय सोहळ्यानिमित्त प्रत्येक भारतीय नागरिकाला आम्ही मनःपूर्वक शुभेच्छा आणि हार्दिक मंगलकामना व्यक्त करीत आहोत.

हा ऐतिहासिक टप्पा आपल्याला लाभलेल्या स्वातंत्र्याचे मोल जपण्याची, परस्परांतील ऐक्याचे बंध अधिक दृढ करण्याची आणि आपल्या प्रिय राष्ट्रासाठी अधिक उज्ज्वल, शांततामय व आशेने परिपूर्ण भविष्य घडविण्यासाठी एकदिलाने कार्य करण्याची प्रेरणा देवो, हीच आमची मनःपूर्वक प्रार्थना.

आपण आपल्या राष्ट्राचा स्वातंत्र्यदिन साजरा करीत असताना, आपल्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य शूर स्त्री-पुरुषांच्या अतुलनीय बलिदानाबद्दल आपली अंतःकरणे स्वाभाविकपणे कृतज्ञतेने भरून जातात. त्यांचे धैर्य, चिकाटी आणि अढळ समर्पण यांच्याच पायावर आपल्या स्वातंत्र्याची भक्कम इमारत उभी राहिली. जवळजवळ आठ दशकांपूर्वी

(...पान ३ वर)


## एको आफ हिज कॉल



**खिस्ती यूट्यूब चॅनल!**

**पास्टर सॅम सेल्वा राज यांच्यातर्फे**

**प्रतिदिन २ मिनिटांचा संदेश!**

इंग्रजी आणि हिंदी भाषेत - प्रातः १ वाजता

तमिळ आणि तेलुगू भाषेत - प्रातः २ वाजता

आणि

तमिळ आणि इंग्रजीत संदेश आणि प्रार्थना

रविवारी सकाळी ८:३० आणि संध्याकाळी ६ वाजता

जर तुम्हाला आशीर्वाद मिळाला असेल, तर कृपया सदस्यता घ्या! ज्यांच्यावर तुम्ही प्रेम करता व काळजी करता त्यांच्यासोबत हे शेअर करा!!

# ECHO OF HIS CALL - (Marching towards 60th year)

Estd. 1969



## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...

**''जे मार्गात सरल आहेत, जे यहोवाच्या नियमशास्त्रात चालतात ते सुखी आहेत'' - स्तोत्र ११९:१**



### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Dr. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
EX MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A, M.Sc.(C&P), PGDHRM, MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech, M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. J. John Rajarathnam, B.E.S., B.D., M.Th.
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Adv. N. Balaji, B.Com., M.L.
EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858
E.MAIL
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.org
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call

ख्रिस्तामधील प्रिय मित्रांनो,

आपला प्रभू व तारणारा येशू ख्रिस्त याच्या अद्भुत आणि गौरवशाली नावात आपणांस मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

प्रभू येशू ख्रिस्ताद्वारे तुम्ही आशीर्वादित आहात. तो तुमच्या गौरवशाली भविष्याकरिता नवीन दारे आणि नवीन संधी उघडून देईल. जसे आपण प्रत्येक परिस्थितीत त्याच्यावर विश्वास ठेवतो, तसेच तुम्हीही त्याच्यावर पूर्ण भरवसा ठेवू शकता. परंतु, आपण प्रभूसमोर विश्वासूपणे चालत राहण्याविषयी सदैव सावध असले पाहिजे.

***जिवंतांच्या भूमीत मी यहोवाच्या समोर चालत जाईन- स्तोत्र ११६;९***

आम्हाला अशी माहिती मिळाली आहे की, येत्या वर्षापासून **एको ऑफ हिज कॉल** या मासिकाच्या प्रत्येक प्रतीवर २.०० (दोन रुपये) इतका टपाल खर्च आकारला जाऊ शकतो. यामुळे आमच्या सेवाकार्यावर मोठा आर्थिक भार पडेल. म्हणून, आपणास आमची नम्र विनंती आहे की, **एको ऑफ हिज कॉल** सारख्या नोंदणीकृत मासिकांसाठी सध्या लागू असलेला टपाल दर कायम ठेवण्यास भारताचे माननीय दळणवळण मंत्री आणि माननीय पंतप्रधान यांच्या अंतःकरणास देव प्रवृत्त करो, यासाठी कृपया प्रार्थना करावी. भारताचे माननीय पंतप्रधान आणि त्यांच्या सहकाऱ्यांना देव उत्तम आरोग्य, ज्ञान, विवेकबुद्धी आणि दीर्घायुष्य यांनी भरपूर आशीर्वादित करो, हीच आमची मनःपूर्वक प्रार्थना.

दि. ४ जुलै २०२६ रोजी आमच्या **नेहेम्या बायबल कॉलेजचा** २६ वा पदवीदान समारंभ परमेश्वराच्या कृपेने मोठ्या आशीर्वादात पार पडला. या समारंभात ३७ विद्यार्थ्यांनी पदवी



*नेहेम्या बायबल कॉलेजचा २६ वा पदवीदान समारंभ.*

प्राप्त केली आणि देवाच्या गौरवशाली सेवाकार्यासाठी त्यांना विशेषतः समर्पित करण्यात आले. आता त्यांना सुवार्तिक, पाळक तसेच ख्रिस्ती सेवाकार्याच्या इतर विविध क्षेत्रांत सेवा करण्यासाठी मिशन क्षेत्रात पाठविण्यात आले आहे.

सुवार्तिक बेंजामिन मोझेस, देवाचे एक थोर सेवक, सुवार्तेचे प्रभावी प्रचारक आणि **एको ऑफ हिज कॉल** (मल्याळम्) चे सहयोगी संपादक यांनी आपल्या धर्मपत्नी श्रीमती प्रमिला बेंजामिन आणि कन्या कु. महिमा बेंजामिन यांच्यासह आमच्या मुख्य कार्यालयाला भेट दिली. त्यांच्याबरोबर आम्हाला धन्य असा सहवास लाभला. त्यांच्याविषयी आम्ही देवाचे मनःपूर्वक आभार मानतो.

Our Ministries: ▫ ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) ▫ BIBLECOR - Postal Courses (3 languages) ▫ YouTube Ministry ▫ Online Courses ▫ Theological Correspondence Courses (2 languages) ▫ Church Planting ▫ Nehemiah Bible Colleges ▫ Gospel Printing Press ▫ Great Commission Partners ▫ St. Paul's Matriculation School ▫ Crusades ▫ Community Development



सुवार्तिक बेंजामिन मोझेस, सहाय्यक संपादक(मल्याळम) व त्यांचे कुटुंब.

भारत हे जवळपास १५० कोटी लोकसंख्या असलेले एक महान लोकशाही राष्ट्र आहे. आकडेवारीनुसार, देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ख्रिस्ती लोकसंख्या केवळ सुमारे २ टक्के आहे. त्यामुळे, ज्यांच्यापर्यंत अद्याप प्रभू येशू ख्रिस्ताची सुवार्ता पोहोचलेली नाही, त्यांच्यापर्यंत ती पोहोचविण्याची महान जबाबदारी आपल्यावर आहे.

हा संदेश आपण वाचत असताना, जर प्रभू आपल्या अंतःकरणाशी बोलत असेल आणि या सेवाकार्यात सहभागी होण्यास आपले मार्गदर्शन करीत असेल, तर त्याच्या मार्गदर्शनानुसार प्रतिसाद देण्यास आम्ही आपणास प्रोत्साहित करतो. कृपया आपल्या स्थानिक पाळकांना व इतर सेवकांनाही आपल्या प्रार्थनांमध्ये स्मरण ठेवा आणि प्रभू जशी आपल्याला सामर्थ्य व संधी देईल त्यानुसार त्यांना पाठिंबा द्या. आम्ही निरंतर आपल्यासाठी प्रार्थना करीत असतो आणि देवाने आपणावर विपुल आशीर्वादांचा वर्षाव करावा, अशी आमची प्रार्थना आहे.

**"......पीक खरोखर फार आहे, परंतु कामकरी थोडे आहेत. म्हणून तुम्ही पिकाच्या प्रभूची प्रार्थना करा की त्याने आपल्या पिकात कापणी करायला कामकरी पाठवून द्यावे"**- मत्तय ९:३७-३८.

येशू ख्रिस्तामधील तुमचा सेवक,

**पास्टर एस्. सॅम सेल्व राज,**

E.mail: sam@echoofhiscall.org

(पान १ वरून...)

जगलेल्या त्या वीरांचे बलिदान हे आज आपण अनुभवत असलेल्या स्वातंत्र्यासाठी मोजलेली किंमत ठरले. त्यांच्या सांडलेल्या रक्ताचेच ते बीज झाले, ज्यातून आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याचे फूल उमलले.

हे सर्व मला याहूनही महान अशा बलिदानाची आठवण करून देते- २००० वर्षांहून अधिक काळापूर्वी प्रभू येशू ख्रिस्ताने कालवरीच्या वधस्तंभावर आपल्या उद्धारासाठी अर्पण केलेल्या त्या महान बलिदानाची. त्याच्या अमूल्य रक्ताद्वारे आपल्याला कितीतरी श्रेष्ठ आणि सार्वकालिक स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे- पापापासून, रोगांपासून, व्यसनांपासून, आध्यात्मिक बंधनांपासून आणि पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या शापांपासून स्वातंत्र्य.

*देवाचे वचन घोषित करते:*

**"तो आमच्यासाठी शाप असा झाला"** (गलती ३:१३)

त्याच्या बलिदानाद्वारे आपली अंधाराच्या सत्तेतून सुटका झाली असून त्याने आपल्याला आपल्या अद्भुत प्रकाशात आणले आहे. प्रभु येशू ख्रिस्त स्वतः म्हणाला: **".... तुम्ही सत्य जाणाल व सत्य तुम्हांला मोकळे करील"** - योहान ८:३२.

देवाची स्तुती असो - येशू ख्रिस्तामध्ये आपण खरोखरच स्वतंत्र आहोत!

**येशू ख्रिस्त आणि वादळ:** मार्ककृत शुभवर्तमानाच्या चौथ्या अध्यायात आपण एक सामर्थ्यशाली प्रसंग वाचतो. प्रभू येशू ख्रिस्त बोटीत झोपलाअसताना त्याचे शिष्य प्रचंड वादळाला तोंड देत होते. भयाने व्याकूळ झालेल्या त्यांनी त्याला जागे केले आणि आर्ततेने म्हणाले: **"......हे गुरु, आम्ही बुडत आहो, याची तू चिंता करीत नाहीस काय?"**

तेव्हा येशू जागे होऊन वाऱ्याला आणि समुद्राला धमकावले आणि मग शिष्यांच्या विश्वासाविषयी त्याने जाब विचारला. तेव्हा ते फारच भ्याले कारण त्यांनी पाहिले की सृष्टीवरही त्याचा पूर्ण अधिकार आहे.

**मार्क ४:३६ म्हणते:**

**"......तो मचव्यात होता तसाच त्याला आपल्याबरोबर घेऊन ते गेले."**

प्रभु येशू ख्रिस्त निरंतर सेवाकार्य करीत होता. त्यामुळे तो शारीरिकदृष्ट्या थकला होता, भावनिकदृष्ट्या श्रांत झाला होता आणि गर्दीपासून दूर आपल्या शिष्यांबरोबर काही क्षण शांततेत विश्रांती घेण्याची त्याला आवश्यकता होती.शिष्यांनी प्रभू येशूला तो जसा होता तसाच - थकलेला, श्रमलेला आणि विश्रांतीची गरज असलेला, असा बोटीत घेतले. बोटीचा प्रवास सुरू होताच तो गाढ झोपी गेला.

आपल्यापैकी अनेकजण या अनुभवाशी स्वतःला जोडू शकतात. दिवसभराची मेहनत, सेवाकार्य, विविध जबाबदाऱ्या किंवा इतर सेवा पूर्ण केल्यानंतर, ज्या क्षणी आपल्याला थोडी शांतता आणि विश्रांतीची जागा मिळते, त्या क्षणी थकवा आपल्यावर हावी होतो.

## अत्यंत महत्त्वाची सुचना!




नजीकच्या भविष्यात **एको ऑफ हिज कॉल**च्या पोस्टल डिस्पॅचमध्ये अपरिहार्य व्यत्यय येऊ शकतात. जर आपल्याला कोणताही व्यत्यय न येता **एको ऑफ हिज कॉल** प्राप्त करणे सुरू ठेवायचे असेल तर कृपया आम्हाला आपले नाव, पत्ता, ईमेल आणि व्हॉटस एप नंबर याची माहिती पत्राद्वारे, ईमेल, फोन कॉल किंवा एस एम एस/व्हॉटस एप संदेशाद्वारे तावडतोब पाठवा.

तुमच्या पाठिंब्यामुळे आम्हाला तुमची चांगली सेवा करण्यास मदत होते!

**आमचा पत्ता:**

**एको ऑफ हीज कॉल**
**१०, मोहम्मद अब्दुल्ला २ री गल्ली, चेपॉक, चेन्नई-६००००५, भारत**
**Cell: (+91) 98412 71858 / 98410 71858 E.mail: sam@echoofhiscall.org**

तरीसुद्धा, याच वचनामध्ये एक लहानसा पण अत्यंत महत्त्वाचा तपशील आहे, जो अनेकदा आपल्या नजरेतून सुटतो; परंतु त्यामध्ये एक गहन आध्यात्मिक सत्य दडलेले आहे: **"आणि दुसरे मचवेही त्याच्याबरोबर होते."**

हा तपशील केवळ मार्क याच्या शुभवर्तमानात नोंदविला आहे. मार्कच्या सुवार्तेत प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराने वर्णन केल्याप्रमाणे अनेक जिवंत आणि तपशीलवार वर्णने आढळतात. हे शुभवर्तमान येशूच्या अत्यंत निकटच्या शिष्यांपैकी एक आणि व्यवसायाने मच्छीमार असलेला पेत्र याच्या साक्षी व प्रभावाखाली लिहिली गेली, असे सर्वसाधारणपणे मानले जाते.

मार्क अनेक तपशील वैशिष्ट्यपूर्णरीत्या नोंदवतो, ज्यामध्ये यांचा समावेश आहे:

* **प्रभू येशू ख्रिस्त वरामावर उशास घेऊन झोपला होता** (मार्क ४:३८).
* **सर्वांनी हिरव्या गवतावर पंक्तिपंक्तीने बसावे म्हणून त्याने त्यांना आज्ञा केली**(मार्क ६:३९).
* **ते शंभर शंभर व पन्नास पन्नास असे पंक्तीने बसले**(मार्क ६:४०).
* **प्रभु येशू ख्रिस्ताने अंध मनुष्याला दोन टप्प्यांत आरोग्य दिल्याची घटना** (मार्क ८:२२-२५).

त्यामुळे, जेव्हा मार्क असे लिहितो की, **"...... आणि दुसरे मचवेही त्याच्याबरोबर होते"**, तेव्हा ती काही अनावश्यक तपशीलवार माहिती नसते. त्यातून एक प्रभावी आध्यात्मिक सत्य उलगडते:

तुमच्या जीवनाकडे अनेकांचे लक्ष आहे. तुम्ही ज्या वादळांतून जात आहात, त्यांचेही लोक निरीक्षण करीत आहेत. संकटातून किंवा बंधनातून प्रभुने तुम्हाला दिलेल्या सुटकेची तुमची साक्ष दुसऱ्या कोणासाठी तरी स्वातंत्र्याचे प्रवेशद्वार ठरू शकते. वादळाच्या मध्यातही प्रभु येशू ख्रिस्ताच्या मागे चालत राहिलेल्या त्या लहान नावांबद्दल मी देवाचे आभार मानतो.

## ते छोटे मचवे आपल्याला कशाची आठवण करून देतात?

### १. ते आठवण करून देतात: तुमच्या सभोवताली असणारे असे अनेक मचवे जे तुमच्यावर लक्ष ठेवून आहेत.

देवाने आपल्याला त्याचे सद्गुण घोषित करण्यासाठी पाचारण केले आहे: **"तुम्ही तर निवडलेला वंश, राजकीय याजक वर्ग, पवित्र राष्ट्र, मोलाने मिळवलेले लोक आहा, यासाठी की ज्याने तुम्हांस अंधारातून आपल्या अद्भुत प्रकाशात बोलावले आहे त्याचे सद्गुण तुम्ही प्रसिद्ध करावे"**- १ पेत्र २:९.

ख्रिस्तामध्ये मिळालेले स्वातंत्र्य हे केवळ आपल्या स्वतःच्या हितासाठी नाही. आपल्या जीवनातून त्याचा प्रकाश प्रकट व्हावा आणि त्या प्रकाशामुळे इतरांनाही त्याच्याकडे येण्याची वाट सापडावी, यासाठी देवाने आपल्याला हे स्वातंत्र्य दिले आहे.

आपल्याला याची जाणीव असो वा नसो, लोक आपल्याकडे लक्ष ठेवून आहेत. ते आपल्या विश्वासाकडे, आपल्या मनोवृत्तीकडे, आपल्या बोलण्याकडे, आपल्या कृतींकडे, संकटाच्या प्रसंगी आपण कसा प्रतिसाद देतो याकडे, आणि जीवनातील वादळांमध्ये आपण स्वतःचे आचरण कसे ठेवतो याकडे बारकाईने पाहत आहेत.

येशू ख्रिस्त म्हणाला:

**"तसाच तुमचा उजेड माणसांपुढे प्रकाशो, यासाठी की त्यांनी तुमची चांगली कामे पाहावी, आणि तुमचा बाप जो आकाशात आहे त्याचे गौरव करावे"**- मत्तय ५:१६.

जीवनातील वादळांच्या मध्यातही आपल्या जीवनातून देवाचा महिमा आणि त्याचा चांगुलपणा प्रकट होवो; आणि ते पाहून इतरांनी स्वर्गातील आपल्या पित्याचे गौरव करावे.

ते छोटे मचवे येशूच्या मचव्याच्या मागे का निघाल्या, हे मला ठाऊक नाही. कदाचित:

* काहीजण कुतूहलापोटी मागे गेले.
* काही जण त्याच्यामागे गेले कारण ते त्याच्या कार्यांमुळे थक्क झाले होते.
* काही जण निरीक्षण करण्यासाठी आणि टीका करण्यासाठी मागे गेले.
* काही जण देवाच्या वचनाची भूक असल्यामुळे त्याच्या मागे गेले.
* काही जण केवळ जवळ असल्यामुळे त्याच्या मागे गेले; त्यांच्यामध्ये मच्छीमार आणि प्रवासी यांचाही समावेश होता.

त्यांच्या मागे येण्यामागचे कारण काहीही असो, पण वादळ आले तेव्हा शिष्यांनी कसा प्रतिसाद दिला, याचे ते साक्षीदार होते.

**आपल्या सभोवताली असलेले ते छोटे मचवे कोण आहेत?**

* आपली मुले
* आपला/आपली जीवनसाथी
* आपले कुटुंबीय
* आपले सहकारी
* आपले शेजारी
* मंडळीतील विश्वासी कुटुंबीय
* आपला समाज

तुम्ही जीवनाच्या प्रवासात एकटे नाही. तुमच्या सभोवताली अनेक छोटे मचवे तुमच्यासोबत प्रवास करीत आहेत. त्या तुमच्या जीवनप्रवासाचे निरीक्षण करीत आहेत आणि संकटसमयी तुम्ही कसे विश्वासाने चालता, हे पाहत आहेत.

### २. ते आठवण करून देतात: तुमच्या जीवनात येशू ख्रिस्त आहे; पण त्यांच्या जीवनात तो अद्याप नाही.

शिष्यांच्या मचव्यात आणि त्या छोट्या मचव्यांमध्ये खरा फरक वादळामुळे नव्हता, तर खरा फरक शिष्यांच्या मचव्यात असलेल्या येशू ख्रिस्ताची उपस्थिती हा होता.

ते छोटे मचवेही त्याच समुद्रात प्रवास करीत होते आणि त्याच वादळाला तोंड देत होते; पण त्यांच्या मचव्यात येशू ख्रिस्त उपस्थित नव्हता.

परंतु आपण जिथे जिथे जातो, तिथे तिथे येशू ख्रिस्ताला आपल्या बरोबर घेऊन जातो. आपण पवित्र आत्म्याचे मंदिर आहोत. येशू ख्रिस्ताची उपस्थिती सदैव आपल्याबरोबर असते.

तरीही आपल्या सभोवताली असे अनेक लोक आहेत, जे अजूनही ख्रिस्ताशिवाय जीवन जगत आहेत. ते भीती, गोंधळ, निराशा, आध्यात्मिक बंधन आणि पापाच्या साखळदंडांत अडकलेले आहेत. येशू ख्रिस्ताला आपल्या जीवनात धारण करणारे लोक कसा प्रतिसाद देतात, कसे बोलतात आणि कसे जीवन जगतात, हे ते बारकाईने पाहत आहेत.

***येशू ख्रिस्ताने घोषित केले:***

**"प्रभूचा आत्मा माझ्यावर आहे, कारण गरिबांना शुभवर्तमान सांगायला त्याने मला अभिषेक केला, पाडाव केलेल्यांना सुटका व आंधळ्यांना दृष्टी हे गाजवायला, ठेचलेल्यांना मोकळे करून पाठवायला,......"**- लूक ४:१८.

हे लक्षात ठेवा: तुम्ही स्वातंत्र्याचे दूत आहात.

देवाने तुम्हाला स्वतंत्र केले आहे, जेणेकरून तुमच्या सभोवताली असलेल्या त्या छोट्या मचव्यांपर्यंत त्याच्या स्वातंत्र्याचा संदेश आणि अनुभव तुमच्या जीवनाद्वारे पोहोचावा.

तुमच्या मचव्यात येशू ख्रिस्त आहे, पण अनेकांच्या मचव्यात तो नाही, हे सत्य कधीही विसरू नका.

तुमचे जीवन हा एक जिवंत संदेश आहे, जो लोक आधीपासूनच वाचत आहेत.

तुम्ही कोणता संदेश देत आहात?

### ३. ते आठवण करून देतात: वादळाचा सामना प्रत्येक मचव्याला करावा लागतो.

वादळाने केवळ येशू ख्रिस्त असलेल्या मचव्यालाच नाही, तर त्या पाण्यावर असलेल्या प्रत्येक मचव्याला तडाखा दिला.

विश्वासी आणि अविश्वासी अशा दोघांनाही

(...पान ६ वर)

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुती आणि प्रार्थनेचे विषय - १९ ऑगस्ट, २०२६ पासून ते १८ सप्टेंबर, २०२६

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## याकरीता देवाची स्तुती करा...

१९ ऑगस्ट - **एको ऑफ हिज कॉल** या आमच्या सेवाकार्याला प्लेट मेकर्स, प्लेट ग्राइंडर्स, स्क्रीन प्रिंटर्स आणि इतरांकडून मिळणाऱ्या बाह्य सहकार्याचा लाभ होत आहे यासाठी देवाची स्तुती करा.

२० ऑगस्ट - आमच्या **नेहेम्या बायबल कॉलेजचे** प्राध्यापक आणि त्यांच्या कुटुंबीयांना देवाकडून मिळणाऱ्या आशीर्वादांसाठी देवाची स्तुती करा.

२१ ऑगस्ट - आमचे **सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन स्कूलचे** मुख्याध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी यांना देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

२२ ऑगस्ट - १० ऑगस्ट २०२६ रोजी संपन्न झालेल्या आमच्या ५७ व्या वर्धापनदिन सोहळ्यावर देवाने विपुल आशीर्वादाचा वर्षाव केला यासाठी देवाची स्तुती करा.

२३ ऑगस्ट - आमच्या मिशन कार्यकर्त्यांच्या महान वचनबद्धतेसाठी देवाची स्तुती करा.

२४ ऑगस्ट - आमचे मुख्य पाळक आणि त्यांचे कुटुंब यांच्याबद्दल देवाला असलेली काळजी यासाठी देवाची स्तुती करा.

२५ ऑगस्ट - गेल्या महिन्यात देवाने आमच्या सर्व गरजा पूर्ण केल्या यासाठी देवाची स्तुती करा.

२६ ऑगस्ट - आमच्या मंडळ्यांमध्ये देव नवीन सदस्यांची भर घालत आहे यासाठी देवाची स्तुती करा.

२७ ऑगस्ट - आमच्या प्रार्थनेतील सहभागीदार, सदस्यत्व घेतलेले सहभागीदार, विश्वासामधील सहभागीदार, जीवनभर सोबत करणारे सहभागीदार, महान सेवाकार्याचे सहभागीदार, विनंती अर्ज पाठविणारे सहभागीदार आणि त्यांचे कुटुंबीय या सर्वांवर देवाने दयेचा हात ठेवला आहे यासाठी देवाची स्तुती करा.

२८ ऑगस्ट - शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी **सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन स्कूलमध्ये** नवीन प्रवेशासाठी देवाची स्तुती करा.

२९ ऑगस्ट - आमचे सर्व कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय यांचे देव संरक्षण करतो यासाठी देवाची स्तुती करा.

३० ऑगस्ट - देवाने आपल्याला असे जोडीदार दिले, जे आपल्याला नैतिक आणि आर्थिक अशा दोन्ही प्रकारे आधार देतात यासाठी देवाची स्तुती करा.

३१ ऑगस्ट - **एको ऑफ हिज कॉल** या मासिकाच्या कार्याला निष्ठापूर्वक पाठिंबा देणाऱ्या समर्पित सहाय्यक संपादकांमुळे आमच्या सेवेला आशीर्वाद लाभला आहे यासाठी देवाची स्तुती करा.

०१ सप्टेंबर - आम्हाला असे समर्पित कर्मचारी लाभले आहेत, जे एकजुटीने आणि एकमताने आपली जबाबदारी पार पाडतात यासाठी देवाची स्तुती करा.

०२ सप्टेंबर - आमच्या मुख्य मंडळीमधील मुला-मुलींच्या तरुणांच्या सहभागितेला देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

०३ सप्टेंबर - मिशन क्षेत्रांमधील आपले मिशनरी आणि त्यांच्या कुटुंबीयांचे देव संरक्षण करतो यासाठी देवाची स्तुती करा.

## कृपया यासाठी प्रार्थना करा...

०४ सप्टेंबर - या संपूर्ण महिन्यात देवाने आमच्या सर्व गरजा पुरवाव्यात यासाठी कृपया प्रार्थना करा.

०५ सप्टेंबर - शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी आमच्या **नहेम्या बायबल कॉलेजातील** सर्व विद्यार्थ्यांसाठी कृपया प्रार्थना करा.

०६ सप्टेंबर - शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी आमच्या **सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन शाळेतील** सर्व विद्यार्थ्यांसाठी कृपया प्रार्थना करा.

०७ सप्टेंबर - आमच्या राज्य समन्वयकांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या सर्वांगीण कल्याणासाठी कृपया प्रार्थना करा.

०८ सप्टेंबर - भारतातील अद्याप सुवार्ता न पोहोचलेल्या प्रदेशांपर्यंत आम्हाला पोहोचता यावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

०९ सप्टेंबर - आमच्या सेवाकार्यासाठी आणि त्यांच्या भावी विस्तारासाठी कृपया प्रार्थना करा.

१० सप्टेंबर - आमचे मुद्रक, सहाय्यक मुद्रक आणि मुद्रणालयातील सर्व कर्मचारी यांच्यासाठी कृपया प्रार्थना करा.

११ सप्टेंबर - संपूर्ण जगभरातील स्त्रिया आणि बालकांच्या सुरक्षिततेसाठी व संरक्षणासाठी कृपया प्रार्थना करा.

१२ सप्टेंबर - मद्यपानाच्या व्यसनाधीन व्यक्तींना आणि दुष्कर्म करणाऱ्यांना प्रभूने पश्चात्तापाकडे वळवावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

१३ सप्टेंबर - सर्व राष्ट्रांमध्ये ऐक्य आणि शांतता नांदावी यासाठी कृपया प्रार्थना करा.

१४ सप्टेंबर - ख्रिस्ती सुवार्तिकांनी सुवार्तेची विश्वासूपणे व कोणतीही तडजोड न करता घोषणा करावी यासाठी कृपया प्रार्थना करा.

१५ सप्टेंबर - सर्व ख्रिस्ती संस्था आणि मंडळ्यांवर देवाचा आशीर्वाद व संरक्षण राहावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

१६ सप्टेंबर - कारागृहांमध्ये सेवाकार्य करणाऱ्या देवाच्या सेवकांसाठी कृपया प्रार्थना करा.

१७ सप्टेंबर - आमचे वरिष्ठ पास्टर एस. सॅम सेल्वा राज यांना त्यांच्या बहुआयामी सेवाकार्यासाठी नवीन दृष्टी व मार्गदर्शन लाभावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

१८ सप्टेंबर - आमचे वरिष्ठ पास्टर एस. सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबाचे सर्व दुष्ट शक्तींपासून प्रभूने संरक्षण करावे व त्यांना सुरक्षित ठेवावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

(पान ४ वरुन)

वादळांचा सामना करावा लागतो. आपल्या मचव्यात येशू ख्रिस्त आहे याचा अर्थ असा नाही की आपल्या जीवनात कधीही वादळे येणार नाहीत. परंतु प्रत्येक वादळापेक्षा महान असा तारणारा आपल्याबरोबर आहे, याची ती खात्री आहे.

आपल्यावर वादळे पुढील प्रकारे येऊ शकतात:

- ❊ भावनिक संघर्ष
- ❊ आर्थिक संकटे
- ❊ कौटुंबिक संघर्ष
- ❊ आरोग्यविषयक आव्हाने
- ❊ आध्यात्मिक हल्ले

शत्रू वादळांचा उपयोग करून आपले लक्ष केवळ आपल्या स्वतःच्या दुःखांकडे केंद्रित करतो आणि आपल्या सभोवतालच्या त्या छोट्या मचव्यांचा आपल्याला विसर पडावा, अशी त्याची इच्छा असते. तो आपल्याला पुढील गोष्टींनी भारावून टाकू इच्छितो:

- ❊ चिंता आणि भावनिक ओझी
- ❊ कौटुंबिक जबाबदाऱ्या
- ❊ आर्थिक अडचणी
- ❊ शारीरिक अशक्तपणा
- ❊ आध्यात्मिक शिथिलता

जेव्हा आपण आपल्या स्वतःच्या संघर्षात इतके गुरफटून जातो की, ज्यांना आपल्या प्रार्थना, प्रोत्साहन, सहानुभूती आणि ख्रिस्ताविषयीच्या साक्षीची गरज आहे, त्या लोकांची आपल्याला जाणीवही राहत नाही.

परंतु देव आपल्याला वादळावर मात करून उभे राहण्यास बोलावतो.

*यशया ४०:३१ मध्ये असे घोषित करण्यात आले आहे:* "**परंतु जे यहोवाची प्रतीक्षा करतात ते आपली शक्ती नवी करतील; ते गरुडासारखे पंखांनी वर जातील, ते धावतील तरी दमणार नाहीत; ते चालतील तरी थकणार नाहीत.**"

कदाचित तुम्हाला असे वाटत असेल की, तुम्ही एका एकाकी दरीतून चालत आहात. तुमच्यावर अशी ओझी आहेत जी सहन करणे कठीण झाले आहे, आणि या वादळातून कसा तरी मार्ग निघावा किंवा सुटका व्हावी, अशी तुमच्या मनात तीव्र इच्छा आहे. तरीही ज्याने तुम्हाला बोलावले तो देव विश्वासू आहे.

आज तुम्ही ज्या वादळाला सामोरे जात आहात, तेच कदाचित तुमची अशी साक्ष ठरेल की, तुमच्या प्रवासाकडे लक्ष ठेवून असलेल्या असंख्य छोट्या मचव्यांना आशा आणि स्वातंत्र्य मिळेल.

तुम्ही सध्या ज्या संघर्षाचा अनुभव घेत आहात, त्याच संघर्षाचे देव इतरांसाठी आशीर्वादात रूपांतर करू शकतो –अगदी अशा लोकांसाठीही, ज्यांना तुम्ही कदाचित कधीच ओळखत नसाल.

धैर्य सोडू नका.

तुमच्या जीवनरूपी मचव्यात येशू ख्रिस्त आहे, याचा अर्थ काय असतो, हे तुमच्या जीवनाच्या साक्षीद्वारे त्या छोट्या मचव्यांना दाखवून द्या.

**४. वादळातील तुमची प्रतिक्रिया त्या छोट्या मचव्यांवर प्रभाव टाकते.**

जेव्हा शिष्य भयभीत झाले आणि ओरडून म्हणाले: "**हे गुरु, आम्ही बुडत आहो, याची तू चिंता करीत नाहीस काय?**" त्यांच्या सभोवतालच्या त्या छोट्या मचव्यातील लोकही नक्कीच भयाने भरून गेले असतील.

येशू ख्रिस्त असलेला मचवाच जर वादळात डळमळत होती, तर इतर नावांना कोणती आशा उरली असती?

संकटाच्या काळातील तुमची प्रतिक्रिया अनेकदा सुखाच्या काळात बोललेल्या तुमच्या शब्दांपेक्षा अधिक प्रभावीपणे बोलते.

संकटसमयी तुम्ही आशा नसलेल्या लोकांप्रमाणे वागता का? की वादळातही तुमच्याबरोबर असलेल्या प्रभू येशू ख्रिस्ताला तुमच्या जीवनातून प्रकट करता?

त्या तीन हिब्रू तरुणांनी जाहीर केले: "........... **ज्याची सेवा आम्ही करतो तो आमचा देव आम्हांला जळत्या अग्नीच्या भट्टीतून सोडवायला समर्थ आहे;.......... परंतु जरी नाही..........**" (दानीएल ३:१७-१८).

विश्वासाची किती सामर्थ्यशाली अभिव्यक्ती: "**परंतु जरी नाही.........**"

आपल्याजवळ असा विश्वास आहे का की जो केवळ परिस्थितीवर अवलंबून नसतो, तर असा विश्वास, जो दूरून आपल्या जीवनाकडे पाहणाऱ्या प्रत्येक छोट्या मचव्याला धैर्य व बळ देतो?

"***पौलाने जाहीर केले:*** **......... मी ज्याच्यावर विश्वास ठेवला तो मला ठाऊक आहे,........**" - २ तीमथ्य १:१२.

वादळाच्या काळातील तुमचा विश्वास दुसऱ्या कोणासाठी तरी सामर्थ्याचा स्रोत ठरू शकतो.

**५. ते आठवण करून देतात: त्या छोट्या मचव्यांचे धैर्य आणि आशा तुमच्या संकटातून झालेल्या सुटकेवर अवलंबून असते.**

जेव्हा येशू ख्रिस्ताने वादळ शांत केले, तेव्हा त्याच्या सभोवतालच्या प्रत्येक छोट्या मचव्यालाही त्याच्या सामर्थ्याचा परिणाम अनुभवायला मिळाला. तो चमत्कार केवळ शिष्यांसाठीच नव्हता; तर जवळ असलेल्या प्रत्येक मचव्यासाठीही तो शांती घेऊन आला.

प्रिय बंधूंनो आणि भगिनींनो, काही वेळा देव आपल्याला संकटे, वादळे, परीक्षांचे प्रसंग आणि अनपेक्षित काळ यांतून जाऊ देतो. कारण आपल्या संकटातून झालेल्या सुटकेद्वारे इतरांच्या जीवनात आशा जागृत करण्याचा त्याचा उद्देश असतो.

तुमची संकटातून झालेली सुटका दुसऱ्या कोणासाठी तरी आशीर्वाद ठरू शकते.

तुमची प्रार्थना दुसऱ्या व्यक्तीसाठी दरवाजे उघडू शकते.

तुमची चिकाटी, शांतपणे संघर्ष करणाऱ्या

(पान ९ वर)


नहेम्या बायबल कॉलेजेस

चेपॉक आणि संतोषपुरम, वेलाचेरी, चेन्नै

प्रवेशा करिता त्वरा करा !

शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक

माध्यम : तमिळ (अर्धवेळ) हिंदी (अर्धवेळ)

ईश्वरविद्या डिप्लोमा & Bachelor of Theology

आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५७ वर्षांपासून मान्यता प्राप्त

संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.

Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858

E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

❊ ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे ❊

## -: आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या :-

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. **एको ऑफ हिज कॉल** : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
३. **बायबलकोर** : मुळभूत बायबल अभ्यासक्रम (इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी)
४. पत्रव्यवहाराद्वारे थिर्योलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
५. नहेम्या बायबल कॉलेज : (चेपॉक, संतोषपुरम आणि वेलाचेरी)
६. शाखा चर्च : संतोषपुरम, बालाजी नगर आणि वेलाचेरी
७. महान आज्ञापालनाचे भागीदार : (पाळकांचे नेटवर्क)
८. प्रशिक्षण कार्यक्रम : सेमिनार आणि रिट्रीटो
९. महासभा
१०. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
११. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
१२. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१३. रवीवारी शब्बाथ शाळा : सकाळी १०.३० आणि सायंकाळी३ वाजता-रविवारी (चेपॉक, वेलाचेरी, बालाजी नगर आणि संतोषपुरम)
**१४. सकाळची उपासना : रविवारी सकाळी ५.३० वाजता**
**१५. सुरुवातीची उपासना : रविवारी सकाळी ८.०० वाजता**
**१६. तामिळ उपासना : रविवारी सकाळी ८.३० वाजता**
**१७. युवा सभा : रविवारी दुपारी ११.०० वाजता**
**१८. सहभाग भोजन : रविवारी दुपारी १.०० वाजता**
**१९. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**२०. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**२१. तमिळ आणि इंग्रजी उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
२२. अभिप्रायाची वेळ : सायंकाळी ७.३० वाजता - रविवारी
२३. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
२४. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
२५. शिष्यत्त्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२६. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२७. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२८. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार
२९. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
३०. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शुक्रवार
३१. उपवास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शनिवार
३२. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
३३. तरुण/तरुणी/लहान लेकरांसाठी प्रार्थना : दररोज रात्रो १० वाजता (फोन द्वारा)
३४. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
३५. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल

### टपाल द्वारे धर्म शास्त्राचे अभ्यासक्रम

केवळ भारतातील उमेदवारां करीता

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभुत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुवार्तिक, ख्रिस्ती पुढारी आणि अशिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. **'सर्टफिकेट इन मिनिस्ट्री'** प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

*अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -*

अध्यक्ष - नहेम्या बाईबल कॉलेज
एको ऑफ हिज कॉल, पोस्ट बॉक्स नं. २९५७,
चिपॉक, चैन्नई - ६०० ००५
फोन : (०४४) २८५२ ८२८२, २८५२ ९२९३,
फोन : ९८४१० ७१८५२, ९५६६१ ३१८५८
E-mail: biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् अॅप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| **Account Name** | : | **ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | : | **1023 2923 805** |
| **Bank Name** | : | **STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | : | **TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | : | **SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | : | **SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)


(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)

## तुम्हाला शंभरपट प्रतिफळ मिळेल आणि तुम्ही सार्वकालिक जीवनाचे वतन प्राप्त कराल!

**''जे काही करायला तुझ्या हाताला प्राप्त होते ते तू आपल्या पराक्रमाने कर; ..........''** - उपदेशक ९:१०

**''जो वारा पाहत राहतो तो पेरणी करणार नाही, आणि जो मेघांकडे पाहत राहतो तो कापणी करणार नाही''** - उपदेशक ११:४

जीवनाच्या सर्व स्तरांतील लोकांना बायबल कॉरस्पॉन्डन्स कोर्सेस आणि बायबल कॉलेजेसच्या माध्यमातून पवित्र शास्त्रातील गहन सत्ये शिकवावी, ही माझी दीर्घकाळापासूनची इच्छा होती. हा सेवाभार माझ्या अंतःकरणात खोलवर रुजला होता आणि वर्षानुवर्षे अधिक तीव्र होत गेला. तथापि, मी स्वतःला पूर्णपणे असहाय्य अवस्थेत पाहत होतो. या दृष्टीची पूर्तता करण्यासाठी माझ्याकडे उत्पन्नाचा कोणताही स्रोत नव्हता आणि या कार्यात मला



मार्गदर्शन करणारे किंवा आधार देणारेही कोणी नव्हते. त्या दिवसांत मी आणि माझे कुटुंब दारिद्र्यात जीवन व्यतीत करत होतो. अत्यल्प सोयीसुविधा असलेल्या एका छोट्याशा घरात आम्ही अनेक कठीण प्रसंग आणि हालअपेष्टा सहन केल्या.

सन १९८० मध्ये इंडिया बायबल लिटरेचर (IBL) नावाच्या संस्थेकडून मला सुवार्ता साहित्याचे एक पाकीट मिळाले. ते उघडल्यावर त्यात सुवार्तेची अनेक पत्रके आणि कॉरस्पॉन्डन्स कोर्सची एक पुस्तिका असल्याचे मला दिसले. ते साहित्य वाचत असताना, भारतातील विविध भाषांतील लोकांपर्यंत सुवार्ता पोहोचवण्यासाठी अशाच प्रकारच्या साहित्याचा उपयोग



करावा, अशी तीव्र तळमळ माझ्या अंतःकरणात निर्माण झाली. क्षणाचाही विलंब न करता, मी माझी जुनी सायकल घेऊन चेन्नईतील थाऊजंड लाईट्स येथील इंडिया बायबल लिटरेचर कार्यालयाकडे निघालो.

तेथे माझी मिस्टर. वेलू (मिस्टर. वेलायुथम) या तरुणाशी ओळख झाली. आज ते त्या संस्थेचे कार्यकारी संचालक म्हणून सेवा करीत आहेत. ते अत्यंत काळजीपूर्वक कॉरस्पॉन्डन्स कोर्सची पुस्तके बांधून विविध ठिकाणी पाठवत असल्याचे मी पाहत होतो. त्यांची ती तळमळ आणि सेवाभाव पाहून, देवाच्या गौरवासाठी असेच कार्य करण्याची प्रेरणा माझ्या अंतःकरणात निर्माण झाली.

मी त्यांच्याशी आदराने बोललो आणि काही कॉरस्पॉन्डन्स कोर्सची पुस्तके मिळू शकतील का, अशी विचारणा केली. त्यावर त्यांनी प्रत्येक पुस्तकाची किंमत ५० पैसे (अर्धा रुपया) असल्याचे सांगितले. मी त्यांना सांगितले की, मी एका गरीब कुटुंबातून आलो आहे आणि एका सरकारी विभागात माफक पगारावर नोकरी करतो. माझी परिस्थिती पाहून त्यांनी उदारपणे मला दहा पुस्तके मोफत दिली.

तरीसुद्धा माझ्या मनाचे समाधान झाले नाही. पाठवणी विभागात रचून ठेवलेल्या पुस्तकांच्या ढिगांकडे मी खिडकीतून बराच वेळ पाहत राहिलो. ती पुस्तके जणू मला आर्तपणे साद घालत होती, ''आम्हाला घेऊन जा आणि ज्यांना ख्रिस्ताच्या ज्ञानाची गरज आहे, अशा लोकांच्या हातात आम्हाला दे.'' त्या ठिकाणाहून निघून जाण्याचे माझ्या मनाला धैर्य होत नव्हते.

काही वेळानंतर एक गृहस्थ माझ्याजवळ आले आणि म्हणाले, ''तुम्ही कोण आहात? आणि इतका वेळ आमच्या कार्यालयात डोकावून काय पाहत उभे आहात?'' मी त्यांना माझी परिस्थिती स्पष्ट करून सांगितली की, माझी आर्थिक परिस्थिती अत्यंत मर्यादित आहे; तरीही जिवंत देव प्रभू येशू ख्रिस्ताची सेवा करण्याची माझ्या अंतःकरणात प्रखर तळमळ आहे. म्हणूनच मला आणखी कॉरस्पॉन्डन्स कोर्सची पुस्तके मिळावीत, अशी माझी इच्छा आहे. त्यावर त्यांनी उत्तर दिले, ''तुम्ही आवश्यक रक्कम आणलीत तर ही पुस्तके विकत घेऊ शकता.''



त्या क्षणी मी एक अत्यंत कठीण निर्णय घेतला. माझी जुनी सायकल, जी माझी एकमेव मालमत्ता आणि प्रवासाचे एकमेव साधन होती, ती विकण्याचे मी ठरवले.

मी लगेचच जवळच्या सायकल दुरुस्तीच्या दुकानात गेलो, माझी सायकल शंभर रुपयांना विकली आणि मिळालेल्या त्या रकमेने दोनशे कॉरस्पॉन्डस कोर्सची पुस्तके खरेदी केली. प्रवासाचे माझे एकमेव साधन असलेली सायकल विकल्यामुळे, दोनशे पुस्तके खांद्यावर आणि डोक्यावर घेऊन मी थाऊजंड लाईट्सपासून माझ्या घरापर्यंत जवळजवळ पाच किलोमीटरचा




प्रवास पायी केला.

एवढे जड ओझे वाहण्याची सवय नसल्यामुळे, मी लवकरच पूर्णपणे थकून गेलो. दोनदा माझ्या खांद्यावरील पुस्तकांचा भार घसरून रस्त्यावर पडला. त्या प्रसंगी काही लोकांनी माझी खिल्ली उडवली. त्यामुळे मला अत्यंत असहाय्य आणि अपमानित झाल्यासारखे वाटले. परंतु देवाच्या कृपेने मी सुखरूप घरी पोहोचलो आणि संपूर्ण ताकदीनिशी ती पुस्तके लोकांपर्यंत पोहोचवण्याच्या सेवेत स्वतःला झोकून दिले.

स्वर्गीय बंधू एम. पॉलराज यांच्या सहकार्याने देवाच्या कृपेने न्यू लाइफ - फॉर यू! हा कॉरस्पॉन्डन्स कोर्स सुरु करण्यास मला समर्थ केले. त्यानंतर आम्ही **एको ऑफ हिज कॉल नेहेम्या सायंकालीन बायबल कॉलेजेसची** स्थापना केली.

होय, माझ्या प्रिय मित्रा, देवाच्या राज्याच्या कार्यासाठी माझ्या जुन्या सायकलीचा त्याग करण्याची वेळही माझ्या जीवनात आली होती. माझ्या कुटुंबीयांना आणि मित्रांना माझा हा निर्णय मूर्खपणाचा आणि अज्ञानाचा वाटला. त्या निर्णयामुळे मला बराच अपमान आणि लाजिरवाणी परिस्थिती सहन



करावी लागली. परंतु आज देवाने आपल्या सेवाकार्यासाठी मला वाहने आणि विश्वासू सहकारी यांचा विपुल आशीर्वाद दिला आहे.

माझ्या जीवनात असा एक काळही होता, जेव्हा सुवार्तेचे साहित्य मला स्वतःच्या खांद्यावर आणि डोक्यावर वाहून न्यावे लागत होते. माझ्या तारुण्यातील तो अत्यंत वेदनादायक आणि लज्जास्पद अनुभव होता. परंतु आज देवाने मला प्रवासासाठी मोटारी, तसेच सुवार्तेचे साहित्य आणि सेवाकार्य करणाऱ्या सेवकांच्या वाहतुकीसाठी मोटारी व मिनीबस यांची उदंड व्यवस्था करून दिली आहे.

प्रिय मित्रा, देवाने तुमच्या जीवनासाठी आणि तुमच्या भविष्याकरिता एक विशेष योजना तयार केली आहे. अजूनही तुमच्याकडे योग्य निर्णय घेण्यासाठी वेळ आहे. देवाच्या राज्यासाठी तुम्ही प्रभूला जे काही अर्पण करता, ते कधीही व्यर्थ जात नाही. प्रभू येशू ख्रिस्ताला तुमचा आदर्श ठेवा आणि देवाच्या राज्याच्या दृष्टीने प्रेरित होऊन तुमच्याकडील एखादी मौल्यवान गोष्ट त्याच्या सेवाकार्यासाठी समर्पित करा. तुमच्या जीवनावरील देवाच्या आशीर्वादांना अंत राहणार नाही.

हे लक्षात ठेवा:

***जीवन एकदाच मिळते; ते लवकरच संपून जाईल.***
***परंतु प्रभू येशू ख्रिस्तासाठी जे काही केले जाईल,***
***तेच चिरकाल टिकून राहील!***

------------------

(पान ६ वरुन...)

एखाद्या व्यक्तीला धैर्य आणि सामर्थ्य देऊ शकते.

काही वेळा देव आपल्याला संकटांच्या वादळांतून जाऊ देतो, कारण आपल्या जीवनाची साक्ष दुसऱ्या कोणाच्या तरी मुक्तीचा मार्ग बनावी, ही त्याची इच्छा असते.

पौल आणि सीलास यांचे स्मरण करा. त्यांना तुरुंगात डांबून साखळदंडांनी जखडण्यात आले होते; तरी त्यांनी निराशेला शरण न जाता प्रार्थना केली आणि देवाची स्तुती-आराधना गायली.

पवित्र शास्त्र म्हणते:

"**आणि मध्यरात्रीच्या सुमारास पौल व सीला हे प्रार्थना करून देवाला गाणी गात असता बंदिवान त्यांचे ऐकत होते**"- प्रेषित १६:२५.

भीती, असत्य आणि सैतानाच्या युक्त्यांच्या बंधनात अडकलेले अनेक लोक, तुम्ही तुमच्या जीवनातील वादळांतून जात असताना तुमच्या जीवनाची साक्ष पाहत आणि तुमचे शब्द ऐकत असतात.

तुमच्या जीवनातून त्यांना काय ऐकू येत आहे?

देवाची स्तुती, अढळ विश्वास आणि विजयाची साक्ष?

की भीती, तक्रारी आणि निराशेचा आवाज?

आणि मग एकाएकी:

"**तेव्हा एकाएकी असा मोठा भूमिकंप झाला की बंदिशाळेचे पाये डगमगले, आणि सर्व दरवाजे लागलेच उघडले व सर्वांचे बंद सुटले**" -प्रेषित १६:२६.

प्रिय बंधूंनो आणि भगिनींनो, या शब्दाकडे लक्ष द्या:

"सर्वांचे"

केवळ पौल आणि सीलासच नव्हे, तर तेथील सर्व कैदी स्वतंत्र झाले.

त्यांच्या जवळ असलेल्या, परिचित आणि अपरिचित अशा सर्व कैद्यांनी स्वातंत्र्याचा अनुभव घेतला, कारण देवाच्या त्या दोन सेवकांनी दुःखाच्या मध्यातही देवाची स्तुती करण्याचा मार्ग निवडला.

हेच देवाच्या कृपेचे सामर्थ्य आहे.

तुमची उपासना अशा बंधनांना तोडण्याची किल्ली ठरू शकते, जी बंधने तुम्ही स्वतः कधीच पाहिली नसतील. आमेन!

## सर्वांसाठी स्वातंत्र्य

प्रभू येशू ख्रिस्ताने आपल्यापैकी प्रत्येकाला त्याच्या स्वातंत्र्याचे साधन होण्यासाठी पाचारण केले आहे, जेणेकरून सैतानाच्या कारस्थानांनी, फसवणुकीने, भीतीने आणि अंधकाराने बंधनात अडकलेल्या लोकांपर्यंत आपण पोहोचू शकू.

छोटे मचवे आजही आपल्या सभोवताली आहेत.

त्या आशेच्या शोधात आहेत.

त्या शांतीची आस धरून आहेत.

त्या तुमच्या जीवनातून प्रभू येशू ख्रिस्ताचे जिवंत वास्तव प्रकट होताना पाहण्याची वाट पाहत आहेत.

कदाचित प्रभू येशू ख्रिस्ताचे जे प्रतिबिंब त्यांना दिसेल, ते तुम्ही आणि मीच असू शकतो.

केवळ तुमच्या स्वतःच्या मचव्यात प्रभू येशू ख्रिस्त आहे, एवढ्यावरच समाधान मानू नका, तर तुमच्या सभोवतालच्या त्या छोट्या मचव्यांनाही त्याची गरज आहे.

आपल्या सभोवतालच्या लाखो लोकांपर्यंत त्याने दिलेले स्वातंत्र्य घेऊन जाण्यास देव आपल्याला समर्थ करो - अशा अनेक लोकांपर्यंत, ज्यांना आपण कदाचित अनंतकाळापर्यंत कधीच भेटणार नाही. प्रभू येशू ख्रिस्ताशिवाय जीवनरूपी छोट्या मचव्यांतून प्रवास करणाऱ्या लोकांपर्यंत त्याने दिलेले स्वातंत्र्य पोहोचविणारे खरे स्वातंत्र्यसैनिक होण्यासाठी देवाने आपल्याला पाचारण केले आहे.

***छोट्या मचव्यांची आठवण ठेवा!!***

*********

### सूचना

कृपया आमचे मोबाईल क्रमांक (+९१) ९८४१० ७१८५८, (+९१) ९८४१२७१८५८ (मुख्य क्रमांक) आपल्या मोबाईल फोनमध्ये जतन करून ठेवा.

**- संपादक**

Posted at "Egmore RMS Patrika Channel" RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## OUR BANK DETAILS:

### 1. Bank : State Bank of India

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### 2. Bank : ICICI Bank

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

### 3. Bank : State Bank of India

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

## OUR QR CODE:

ECHO OF HIS CALL

Scan to pay with any UPI app

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
E.mail : sam@echoofhiscall.org

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य, गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-    आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.org

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26
WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26
Date of Publication: Second week of every month
Date of Posting : 11th & 12th of every month
Posted at "Egmore RMS Patrika Channel"
on 12th AUGUST 2026.

If un-delivered please return to:

**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
P.O. Box No. 2957,
Chepauk, Chennai - 600 005, INDIA.
Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766

*JESUS LOVES YOU!*

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers**, New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**